असतो मा सद्गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।।
SANDIP FOUNDATION

SANDIP FOUNDATION'S
# SANDIP INSTITUTE OF ENGINEERING & MANAGEMENT
Mahiravani, Trimbak Road, Tal. & Dist. : Nashik - 422213, Maharashtra, India.

**संदर्भ क्र.:** एसएफ/एसआयइएम/आस्था/२०१८-१९/ 384. **दिनांक :** ०२/११/२०१८

प्रति,
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**विषय** :- सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला त्या संदर्भातील अहवाल सादर करणेबाबत...

**संदर्भ** :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संदर्भिय पत्र क्र. विविमं/२०१८-१९/५२२ दिनांक: २९/१०/२०१८.

मा. महोदय,
वरील संदर्भीय पत्रास अनुसरून संदिप फांऊडेशन संचलित संदिप इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट या अभियांत्रिकी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी साजरा करण्यात आला त्या संदर्भातील अहवाल खालील प्रमाणे :

विश्वविद्यालय अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी निर्देशित केल्याप्रमाणे संदिप फाऊंडेशन संचलित, संदिप इंस्टीटयुट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट या महाविद्यालयात लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने बुधवार दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी 'रन फॉर युनिटी' अर्थात एकता दौड आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्हि. क्षिरसागर यांनी राष्ट्रीय एकात्मतेत भारतीय ऐक्य, सुरक्षा व संरक्षण याकरिता सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाची जाणीव करून दिली आणि या क्षेत्रामध्ये त्यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो हे देखिल सांगितले.

प्राचार्य डॉ. क्षिरसागर यांनी लाल झेंडा दाखवून रनला सुरुवात करण्यात आली. या दौडमध्ये महाविद्यालयाचे सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी व तसेच सर्व शिक्षकांनी उत्फुर्तपणे सहभाग नोंदवला. महाविद्यालय परिसरामध्ये सकाळी १० वाजता एकता दौडला सुरुवात करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी व कर्मचा-यांनी १ कि.मी. रन पुर्ण केला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे पोस्टर बनवून आणले होते. तसेच यावेळी राष्ट्रीय एकतेच्या विविध घोषणा देण्यात आल्या.

याप्रसंगी वकृत्व व वादविवाद स्पर्धांचेंही देखिल आयोजन करण्यात आले. सर्व विजयी विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या हस्ते बक्षीसे देउन गौरवण्यात आले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. आर. व्हि. क्षिरसागर, डिन्स, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

तसेच सदर अहवाल विद्यापीठ अनुदान आयोगाच्या http://www.ugc.ac.in/uamp या संकेतस्थळावर भरण्यात आला आहे. सदर अहवाल आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सनिवय सादर करीत आहोत.

कळावे,

SIEM
Sandip Institute of Engineering & Management
Mahiravani, Nashik

**डॉ. आर. व्हि. क्षिरसागर**
**प्राचार्य**

**सोबत** :- १. छायाचित्रे.
२. महाराष्ट्र टाइम्स या वृत्त पत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीचे कात्रण.
३. YouTub ला लिंक केलेली व्हिडिओ- https://youtu.be/Ff3Q0gw8UVE



Sandip Institute of
SIEM
Mahiravani, Nashik



Sandip Institute of Engineering
SIEM
Mahiravani, Nashik



Sandip Institute of Engineering & Management
SIEM
Mahiravani, Nashik



Sandip Institute of Engineering & Management
SIEM
Mahiravani, Nashik



Sandip Institute of Engineering & Management
SIEM
★ Mahiravani, Nashik ★

# सरदार पटेल यांच्या स्मृतींना उजाळा

अक्षय सराफ, कॉलेज क्लब रिपोर्टर

**संदीप फाउंडेशनमध्ये कार्यक्रमाचे आयोजन**

संदीप फाउंडेशन संचलित संदीप इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँण्ड मॅनेजमेंट कॉलेजमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवींद्र क्षीरसागर हे होते. यावेळी डॉ. क्षीरसागर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याला उजाळा दिला.

यावेळी त्यांनी सरदार पटेल यांनी राष्ट्रीय ऐक्य, सद्‌भावना, देशाची सुरक्षाव्यवस्था यामध्ये दिलेले मोलाचे योगदान याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनीदेखील सरदार पटेल यांच्या प्रमाणे देशभक्ती, राष्ट्रीय ऐक्य, सद्‌भावना या बाळगत देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे असे आवाहन केले.

सरदार पटेल यांनी एकात्मतेसाठी देशासाठी केलेल्या विविध कार्यांची आठवण म्हणून राष्ट्रीय एकता दिन साजरा केला जातो असे सांगत प्राचार्य डॉ. क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना एकता दिनाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी कॅम्पस परिसरात १ किलोमीटरच्या रन फॉर युनिटी अर्थात एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला.

एकता दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांकरिता डिबेट आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्यांच्या हस्ते विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Maharashtra times newspaper page no. 2, Date : 02/11/2018**

Sandip Institute of Engineering & Management
SIEM
★ Mahiravani, Nashik ★

| | |
|---|---|
| Subject | **Report for National Unity Day Celebration.** |
| From | Sandip Insti.ofEngg.&Mgmt.Mahirvani <CEGN018920@pun.unipune.ac.in> |
| To | Bsd <bsd@unipune.ac.in> |
| Date | Fri, 02 Nov 2018 16:13:00 +0530 |

- Covering Letter with Report.pdf (3.5 MB)
- UGC report.png (77 KB)

Respected Sir/Madam,

We are celebrated the "National Unity Day" in our campus on 31st October, 2018. Please find the attached report here.

--

Sandip Foundation Sandip Institute of Engineering & Management Addr: Post- Mahirvani$$ Nashik - 422 213 Ta: Nashik Dist: Nashik

UG

UGC report.png
77 KB